# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid On Gutkha**

**Police Station** :- **Karanja**

**Date of Good Work done** :- **16/04/2022**

**Brief of the work done :-**

कारंजा येथील लीलावती नगरातील एका टिनशेडच्या खोलीतून तब्बल 71 हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा @PSKaranjaCity पोलिसांनी जप्त केला आहे. त्याप्रकरनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

लोकमत

## कारंजा येथे ७१ हजारांचा गुटखा जप्त

### शहर पोलिसांची कारवाई; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा लाड** : शहर पोलिसांनी १० एप्रिल रोजी लिलावती नगरातील अलकबीर मजिदच्या मागील बाजूस एका टीनशेडमध्ये धाड टाकून ७१ हजार २३० रूपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. दाखल फिर्यादीवरून पोलिसांनी इरशाद अली रजा अली याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला; मात्र आरोपी फरार आहे.

पेट्रोलिंग दरम्यान शहर पोलिसांनी मिळालेल्या गोपनिय माहितीवरून नमूद ठिकाणी धाड टाकण्यात आली. त्याठिकाणी विमल तंबाखुचे ६१९२० रूपये किमंतीचे १०३२ पाकिट, पानपंसद मसाल्याचे ४९६० रूपये किमतीचे ६२ पुडे आणि डीजे काळा तंबाखूचे ५८ पुडे असा एकुण ७१ हजार २३० रूपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. तो पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव यांच्या फिर्यादीवरून इरशाद अली रजा अली याच्याविरूध्द भादंविचे कलम १८८, २६९, २७२, २७३, ३२८ व अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ मधील कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल केला. दरम्यान, या कारवाईवरुन कारंजात गुटखा पुड्यांची साठवणूक सुरुच असल्याचे पुन्हा समोर आले आहे.

Hello Washim
Page No. 1 Apr 16, 2022
Powered by: erelego.com